।।येणे वाग्यज्ञे तोषावे।।



वाणिज्य महाविद्यालय यवतमाळ ट्रस्ट (रजि.क्र. ई-32 (महाराष्ट्र))
द्वारा संचालित

# बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ

माहितीपत्रक - 2018-2019

कनिष्ठ महाविद्यालय, वाणिज्य शाखा (इंग्रजी माध्यम) (स्वयं अर्थसहाय्यित)

कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रम

उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम

बी.ए. व बी.कॉम. पदवी अभ्यासक्रम

एम.ए. व एम.कॉम. पदव्युत्तर अभ्यासक्रम

मूल्यः रु. 20/-

॥येणे वाग्यज्ञे तोषावे॥

वाणिज्य महाविद्यालय यवतमाळ ट्रस्ट (रजि. नं. ई-32) द्वारा संचालित

# बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ

बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय ही यवतमाळ जिल्ह्यातील एक अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे. वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना दि. 26 जुलै 1959 मध्ये झाली. पूर्वी हे महाविद्यालय विशुद्ध विद्यालय, यवतमाळ येथे चालत असे. विशुद्ध विद्यालय, यवतमाळ या संस्थेचे संस्थापक कै. श्रीकृष्ण दत्तात्रय उपाख्य बाबाजी दाते यांनी वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. कै. बाबाजी दाते हे दूरदृष्टीचे असल्याने त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' या योजनेअंतर्गत गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. या महाविद्यालयाचे सुरूवातीचे नाव 'वाणिज्य महाविद्यालय' असे होते. त्यानंतर 'कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ असे नामकरण करण्यात आले. सन 2009 साली महाविद्यालयाचे पुनःनामकरण होऊन आता ते 'बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय' या नावाने ओळखले जाते.

सन 1959 मध्ये महाविद्यालयात वाणिज्य शाखेत एकूण 145 विद्यार्थी शिक्षण घेत होते. हळूहळू या संस्थेचा व्याप वाढत गेला. सन 1962-63 मध्ये या महाविद्यालयात कला शाखेची सुरूवात झाली. तेव्हापासून आजपर्यंत हे महाविद्यालय यवतमाळ जिल्हा तसेच आजुबाजूच्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी शिस्तबद्ध आणि संस्कारक्षम शिक्षणाची सोय उपलब्ध करून देत आहे.

वरिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य व कला शाखेचे पदवी अभ्यासक्रम तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांतर्गत एम.कॉम., एम.ए. मराठी व एम.ए. इतिहास हे वर्ग चालवले जातात. कनिष्ठ महाविद्यालयात 11वी व 12वी वाणिज्य (मराठी व इंग्रजी माध्यम) व कला शाखेचे वर्ग चालवले जातात. सत्र 2017-18 पासून महाविद्यालयामध्ये इंग्रजी माध्यमातून 11वी वाणिज्यचा वर्ग स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू केला आहे. सद्यस्थितीत 2300 पेक्षा जास्त विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

विद्यार्थ्यांना रोजगारक्षम शिक्षण उपलब्ध व्हावे या हेतुने महाविद्यालयात उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत अधिकोष, वित्तीय सेवा आणि विमा (Banking, Financial Services & Insurance), स्वयंचलित तंत्रज्ञान (Automobile Technology), विद्युत तंत्रज्ञान (Electrical Technology) हे वर्ग चालविले जातात.

## संस्थेचे उद्देश :

1. यवतमाळ शहर व ग्रामीण परिसरातील होतकरु विद्यार्थ्यांना गुणात्मक शिक्षण देणे.
2. आर्थिकदृष्ट्या कमकुवत तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालयात पुस्तकपेढी योजना राबविणे.
3. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, ऐक्याची भावना व जिज्ञासा वृद्धिंगत करणे.
4. सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करून राष्ट्रीय मूल्ये व ऐक्य टिकविणे.
5. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना मदत करणे.
6. अभ्यासक्रमातील पूरक घटकांच्या माध्यमातून श्रमप्रतिष्ठा व श्रमसंस्कृती विकसित करणे.

## **बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ**

महाविद्यालय दिनांक 14 जून 2018 रोजी सुरू होईल. महाविद्यालयाचे वर्ग दोन सत्रात राहतील. वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय-वाणिज्य शाखा (इंग्रजी माध्यम) चे वर्ग सकाळ सत्रात राहतील व कनिष्ठ महाविद्यालय (मराठी माध्यम) आणि उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C.Vocational) चे वर्ग दुपार सत्रात राहतील. आवश्यकतेप्रमाणे या वेळेत फेरबदल करण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.

2017-18 सत्रापासून इ. 11वी वाणिज्य व सत्र 2018-19 पासून इ. 12वी वाणिज्य शाखेचा एक वर्ग इंग्रजी माध्यमातून स्वयं-अर्थसहाय्यित (**Self-Finance**) तत्त्वावर सुरू झाला आहे. फक्त या वर्गाव्यतिरिक्त कला आणि वाणिज्य शाखेतील इतर सर्व वर्गांकरिता शिक्षणाचे माध्यम मराठी राहील.

### **महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय**

---

**कनिष्ठ महाविद्यालय**

**वर्ग 11-कला शाखा**

- **अनिवार्य विषय**

1. इंग्रजी (English)
2. मराठी (Marathi)
3. शारीरिक शिक्षण (Physical Education)
4. पर्यावरण (Environment)

- **ऐच्छिक विषय (कोणतेही 4 विषय निवडावे)**

1. इतिहास किंवा अन्नशास्त्र (History/Food & Nutrition)
2. समाजशास्त्र किंवा संस्कृत (Social Science/Sanskrit)
3. अर्थशास्त्र किंवा संगीत प्रात्यक्षिक (Economics/Music Practical)
4. राज्यशास्त्र किंवा संगीत सिद्धांत (Political Science/Music Theory)
5. भूगोल किंवा गृहव्यवस्थापन (Geography/Home Science)

**वर्ग 12-कला शाखा**

- **अनिवार्य विषय**

1. इंग्रजी (English) 2. मराठी (Marathi)
3. शारीरिक शिक्षण (Physical Education)4. पर्यावरण (Environment)

- **ऐच्छिक विषय (कोणतेही 4 विषय निवडावे)**

1. इतिहास किंवा बालविकासशास्त्र (History/Child Development)
2. भूगोल किंवा वस्त्रशास्त्र (Geography/Textile)
3. अर्थशास्त्र किंवा संगीत सिद्धांत (Economics/Music Theory)
4. राज्यशास्त्र किंवा संगीत प्रात्यक्षिक (Political Science/Music Practical)
5. समाजशास्त्र किंवा संस्कृत (Social Science/Sankrit)

**टीप -** 11वी मध्ये घेतलेले विषयच पुढे 12वी मध्ये कायम राहतील.

**वर्ग 11 व 12 - वाणिज्य शाखा**

1. मराठी (Marathi) किंवा संस्कृत (Sanskrit)
2. इंग्रजी (English)
3. सचिवाची कार्यपद्धती (Secreterial Practice)
4. वाणिज्य संघटन (Organization of Commerce)
5. अर्थशास्त्र (Economics)
6. पुस्तपालन व लेखाकर्म (Book Keeping & Accountancy)
7. पर्यावरण शास्त्र (Environmental Science)
8. शारीरिक शिक्षण (Physical Education)

## 11th & 12th Commerce (English Medium) - Self Finance

11वी व 12वी वाणिज्य शाखेचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग स्वयं-अर्थसहाय्यित तत्वावर राहतील.

**Subjects :**

1. English
2. Marathi OR Hindi OR Sanskrit OR Information Technology
3. Accountancy & Book-keeping
4. Organization of Commerce
5. Economics
6. Secreterial Practice
7. Environmental Science
8. Physical Education

***Note* - Subjects taken in 11th standard will be continued in 12th standard.**

## वर्ग 11 व 12 - उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C. Vocational)

1. अधिकोष, वित्तीय सेवा आणि विमा (Banking, Financial Services & Insurance)
2. स्वयंचलित तंत्रज्ञान (Automobile Technology)
3. विद्युत तंत्रज्ञान (Electrical Technology)

**वरिष्ठ महाविद्यालय (कला शाखा)**

कला विभागासाठी 2 अनिवार्य भाषा आणि ऐच्छिक विषयांच्या गटातून कोणतेही 3 विषय, अशा एकूण 5 विषयांची निवड करावी.

- **अनिवार्य विषय**

1. इंग्रजी अनिवार्य (Compulsory English)
2. मराठी किंवा संस्कृत (Marathi OR Sanskrit)
3. पर्यावरण (Environment) (फक्त बी.ए. द्वितीय वर्षाकरिता)

- **ऐच्छिक विषयांचा गट** (खालीलपैकी कुठलेही 3 विषय निवडावे)

1. राज्यशास्त्र किंवा गृहअर्थशास्त्र (Political Science Or Home Economics)
2. इतिहास किंवा भूगोल किंवा संस्कृत साहित्य (History Or Geography Or Sanskrit Literature)
3. इंग्रजी साहित्य किंवा मराठी साहित्य (English Literature Or Marathi Literature)
4. संगीत किंवा अर्थशास्त्र (Music Or Economics)

.......

**वरिष्ठ महाविद्यालय (वाणिज्य शाखा)**

- **वाणिज्य स्नातक - भाग 1**
    1. इंग्रजी
    2. मराठी किंवा संस्कृत
    3. व्यावसायिक अर्थशास्त्र
    4. व्यवसाय व्यवस्थापनाची मूलतत्त्वे
    5. वित्तीय लेखांकन
    6. संगणकाची मूलतत्त्वे व कार्यप्रणाली
- **वाणिज्य स्नातक - भाग 2**
    1. इंग्रजी
    2. मराठी किंवा संस्कृत
    3. मुद्रा आणि वित्तीय व्यवस्था प्रणाली
    4. प्रमंडळ लेखांकन
    5. आयकर आणि अंकेक्षण
    6. व्यावसायिक गणित आणि सांख्यिकी
    7. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ऍन्ड बिझनेस डाटा प्रोसेसिंग
    8. पर्यावरण
- **वाणिज्य स्नातक - भाग 3**
    1. इंग्रजी
    2. मराठी किंवा संस्कृत
    3. व्यावसायिक पर्यावरण
    4. परिव्यय तथा प्रबंधकीय लेखाकर्म
    5. भारतीय बँकिंग प्रणाली
    6. विम्याची मूलतत्त्वे
    7. बिझनेस रेग्युलेटरी फ्रेमवर्क ऍन्ड कंपनी लॉ
- **पदव्युत्तर अभ्यासक्रम**
    - ➢ वाणिज्य शाखा (एम.कॉम.)
    - ➢ कला शाखा (एम.ए.) - मराठी व इतिहास

**टीपः-**

- खालील वर्गांकरिता Semester Pattern (सत्र पद्धती) लागू राहील, तसेच परीक्षा फॉर्म भरताना विद्यापीठाने निर्धारित केलेले परीक्षा शुल्क प्रत्येक सत्राकरिता वेगळे भरावे लागेल.
  1) बी. ए. भाग 1 व 2
  2) बी. कॉम. भाग 1 व 2
  3) एम. ए. (मराठी व इतिहास) भाग 1 व 2
  4) एम. कॉम. भाग 1 व 2
- बी. ए. भाग 3 व बी. कॉम. भाग 3 या वर्गांकरिता नेहमीप्रमाणे Annual Pattern (वार्षिक पद्धती) सुरू राहील.

---

## प्रवेशासंबंधी सूचनाः

विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रवेशासंबंधीच्या खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्या.

१. इ.११ वी ते पदव्युत्तर अशा सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता **www.dateycollege.in** किंवा **epravesh.com/dateycollege/** या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने प्रवेश-पूर्व अर्ज भरावा.

२. मोबाईलवर देखील महाविद्यालयाचे वरील संकेतस्थळावर जाऊन प्रवेश-पूर्व अर्ज भरता येईल.

३. निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी दुपारी २ वा. पासून संकेतस्थळावर प्रवेश-पूर्व अर्ज उपलब्ध होईल.

४. वाणिज्य आणि कला शाखेच्या प्रथम वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया इ. १२वी चा निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी दुपारी २.०० पासून सुरु होईल.

५. कनिष्ठ महाविद्यालय (इ.११वी) कला आणि वाणिज्य शाखा तसेच एच.एस.सी. व्होकेशनल याकरिता प्रवेश प्रक्रिया इ.१०वी चा निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी दुपारी २.०० पासून सुरू होईल.

६. कनिष्ठ महाविद्यालय (इ.१२वी) कला आणि वाणिज्य शाखा तसेच एच.एस.सी. व्होकेशनल याकरिता प्रवेश प्रक्रिया इ.११वी चा निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी दुपारी २.०० पासून सुरू होईल.

७. पदवी परीक्षांचे निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी दुपारी २.०० पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सुरु होतील.

८. ऑनलाईन प्रवेशपूर्व अर्जाचे शुल्क (महाविद्यालयाच्या माहितीपत्रकासह) रु.७०/- आहे. पण हे शुल्क डिजिटल पद्धतीने (कार्ड पेमेंट/पेटीएम पेमेंट) भरल्यास ते रु. ६०/- असेल. डिजिटल पद्धतीने शुल्क भरणे शक्य नसल्यास कार्यालयात रु. ७०/- रोख भरावे व पावती घ्यावी.

९. प्रवेश-पूर्व अर्ज भरताना त्यासोबत इतर कोणतीही शैक्षणिक कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

१०. ऑनलाईन प्रवेश-पूर्व अर्जाचे शुल्क न भरल्यास तो अर्ज स्वीकारला जाणार नाही.

११. विद्यार्थ्याने प्रवेश-पूर्व ऑनलाईन अर्ज भरला म्हणजे त्याचा प्रवेश निश्चित झाला असे नाही. गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थ्याचे/विद्यार्थिनीचे नाव आल्यावर त्याने/तिने सर्व कागदपत्रांची पूर्तता करून महाविद्यालयाचे निर्धारित शुल्क भरल्यानंतरच त्याचा/तिचा प्रवेश निश्चित समजला जाईल.

१२. विद्यार्थ्यांच्या टक्केवारीच्या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाईल. आणि ही यादी महाविद्यालयात नोटीस बोर्डवर लावली जाईल. गुणवत्ता यादीमध्ये नाव जाहीर झालेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी यादी जाहीर झाल्यावर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून व शुल्क भरून प्रवेश घ्यावा.

१३. गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे शुल्क भरून प्रवेश निश्चित करावा अन्यथा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय प्रवेश आपोआप रद्द होईल.

१४. SC/ST/SBC/VJNT/OBC/EBC च्या शिष्यवृत्ती अथवा सवलतीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळीच त्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व प्रक्रिया पूर्ण कराव्या.

१५. शुल्क भरून प्रवेश निश्चित केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव ते शुल्क परत मिळणार नाही.

१६. विद्यापीठ परीक्षेचे शुल्क विद्यापीठाच्या नियमानुसार नंतर देय राहील.

१७. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या सर्वसाधारण नियमांचे पालन करावे लागेल.

१८. अपवादात्मक आणि विशेष परिस्थितींमध्ये महाविद्यालय प्रवेश नाकारण्याचा आपला अधिकार राखून ठेवते.

१९. विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधीचे संपूर्ण अधिकार प्राचार्य व प्रवेश समितीला राहतील.

**ऑनलाईन प्रवेश-पूर्व अर्ज भरतेवेळी खालील माहिती देणे आवश्यक आहे-**

१. विद्यार्थी/विद्यार्थिनीचा आधारकार्ड क्रमांक

२. विद्यार्थी/विद्यार्थिनीचा मोबाईल क्रमांक

३. Student ID No. (SSC/HSC च्या शाळा सोडल्याचे दाखल्यावर असलेला)

४. पिनकोडसहित पूर्ण पत्ता

५. संबंधित प्रवेशाकरिता पात्र परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा तपशील
(No. of attempts to pass last examination)

६. पासपोर्ट आकाराच्या रंगीत फोटोची JPG फॉरमॅटमधील इमेज अर्जासोबत अपलोड करावी.

---

**ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेश-पूर्व अर्ज दाखल करता येणार नाही अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालय मदत करेल.**

---

**प्रवेशअर्जासोबत जोडावयाची कागदपत्रेः**

१. ऑनलाईन प्रवेश-पूर्व अर्जाची प्रिंट केलेली प्रत

२. इ. १०वी चे (कनिष्ठ महाविद्यालयातील किंवा एचएससी व्होकेशनलच्या प्रवेशाकरिता) आणि इ. १२वी चे उत्तीर्णता प्रमाणपत्र आणि गुणपत्रिकेची मूळ प्रत आणि एक स्व-स्वाक्षरीकृत

(सेल्फ अटेस्टेड) प्रत. कागदपत्रांची सत्यता पडताळणी झाल्यानंतर मूळ गुणपत्रिका परत करण्यात येईल.

३. शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (ट्रान्सफर सर्टिफिकेट) मूळ प्रत आणि एक स्व-स्वाक्षरीकृत (सेल्फ अटेस्टेड) प्रत. प्रवेश निश्चित झाल्यास सदर दाखल्याची मूळ प्रत परत मिळणार नाही.

४. SC/ST/SBC/VJNT/OBC/EBC च्या विद्यार्थ्यांनी कास्ट सर्टिफिकेटची मूळ प्रत आणि एक स्व-स्वाक्षरीकृत (सेल्फ अटेस्टेड) प्रत सादर करावी. सत्यता पडताळणीनंतर मूळ प्रत परत केली जाईल.

५. पात्रता परीक्षा खाजगीरीत्या उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्याने जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळेचा दाखला व बोर्डाच्या प्रमाणपत्राची प्रमाणित मूळ प्रत जोडावी.

६. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाव्यतिरिक्त अन्य विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाचे वेळी प्रवजन प्रमाणपत्र (Migration Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

७. विद्यार्थ्याचा पासपोर्ट आकाराचा अलीकडील रंगीत फोटो - २ प्रती

८. प्रवेश अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रे असावीत. काही त्रुटी असल्यास प्रवेश तात्पुरता समजला जाईल.

## शुल्क भरण्यासंबंधी सूचनाः

1. अध्ययन शुल्कात कोणतीही सवलत मिळणार नाही.
2. प्रारंभीचे निर्धारित शुल्क पूर्ण भरल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही.
3. भरलेले कोणतेही शुल्क कोणत्याही कारणासाठी परत मिळणार नाही. बदली इ. किंवा अन्य कारणाने सत्राच्या मध्येच महाविद्यालय सोडल्यास किंवा प्रवेश घेतल्यास संपूर्ण शुल्क भरावे लागेल.
4. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ/राज्य शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या आदेशाप्रमाणे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.
5. पुढील वर्गाचा अभ्यासक्रम सुरू ठेवण्याची अनुज्ञप्ती प्राप्त (ए.टी.के.टी.) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला पूर्ण वर्षाचे संपूर्ण शुल्क प्रवेश घेतानाच भरावे लागेल.
6. विनाअनुदानीत वर्गातील विद्यार्थ्यांना शासनाकडून ईबीसी,पीटीसी,एसटीसी,एनटीसी फी सवलत मिळणार नाही. त्यांना शासनाने/विद्यापिठाने वेळोवेळी आकारलेली फी महाविद्यालयाकडे जमा करावी लागेल.
7. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला अनुसरून सुधारित शिक्षण शुल्क तसेच इतर शुल्काला शुल्क निर्धारण प्राधिकरणाने मंजुरी दिल्यानंतर विद्यार्थ्यांना वाढीव शुल्क भरणे सक्तीचे राहील.
8. शासन निर्णयानुसार शुल्कामध्ये वेळोवेळी बदल होऊ शकतो.
9. विद्यापीठ परीक्षा आवेदनपत्र भरतांना विद्यापिठाच्या आदेशाप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाईल.

## शिष्यवृत्ती व सवलतप्राप्त विद्यार्थ्यांकरिता शुल्कासंबंधी नियम

1. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांची (ई.बी.सी.) सवलत, तसेच सरकारकडून मिळणारे शुल्क माफी व अन्य सर्व शिष्यवृत्त्या, गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्याला मिळू शकतात. प्रवेश घेतांना त्यासंबधीचा अर्ज भरुन देण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची आहे.
2. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांची (ई.बी.सी.) सवलत घेऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्याला ज्या महिन्यात त्याची उपस्थिती 75 टक्क्यांपेक्षा कमी असेल त्या महिन्याचे पूर्ण शुल्क भरावे लागेल. भारत सरकार शिष्यवृत्ती मिळविणारा विद्यार्थी ज्या महिन्यात महाविद्यालयात 75 टक्क्यांपेक्षा कमी उपस्थित असेल त्या महिन्याचे पूर्ण शुल्क त्याच्याकडून वसूल केले जाईल.
3. शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्याचे प्रयोगशाळा शुल्क किंवा इतर शुल्क शासनाकडून मिळाले नाही तर ते विद्यार्थ्याला भरावे लागेल.
4. ओळखपत्र दाखविल्याशिवाय कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती मिळणार नाही.
5. भारत शासन शिष्यवृत्ती, ई.बी.सी. सवलत तसेच इतर सवलतींकरिता दिलेल्या मुदतीत अर्ज भरावा.
6. शिक्षणविभागाकडून कोणत्याही कारणास्तव सवलतधारक विद्यार्थ्यांना EBC/PTC/STC/OBC इत्यादि फी सवलती मंजूर न झाल्यास संबंधित विद्यार्थ्याला पूर्ण शुल्क भरावे लागेल. तसेच शासनाने वेळोवेळी वाढवलेले शुल्क विद्यार्थ्याला भरावे लागेल आणि वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल. शिष्यवृत्ती अर्ज नामंजूर झाल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही.
7. आवश्यक अटी व पात्रता पूर्ण करणाऱ्या इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) संवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती व फी माफीची सवलत दिली जाईल. त्याकरिता जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.
8. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय (ई.बी.सी) सवलत घेणारे विद्यार्थी व शासनाकडून शिष्यवृत्ती घेणारे विद्यार्थी यांना शासनाकडून जे शुल्क मिळणार नाही तेवढेच भरावे लागेल.
9. समाजकल्याण विभागाकडून जी फी सवलत प्राप्त होणार नाही त्याची फी महाविद्यालयात भरावी लागेल.

## इ. 12वी च्या विद्यार्थ्यांकरिता विशेष सूचना

बाबाजी दाते कला आणि वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय आणि विवेकानंद विद्यालयामधून 12वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी 12वी चा निकाल जाहीर झाल्यापासून 10 दिवसांच्या आत ऑनलाईन प्रवेश-पूर्व अर्ज भरावा. दिलेल्या मुदतीच्या आत या विद्यार्थ्यांनी सदर अर्ज न भरल्यास त्यांना प्रवेश देण्यास महाविद्यालय बांधील राहणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## शासकीय शिष्यवृत्ती आणि सवलतींबाबत नियम व आवश्यक कागदपत्रे

### भारत सरकार शिष्यवृत्ती (मागासवर्गीयांकरिता) Government of India (GOI) Scholarship

1. पालकांचा उत्पन्नाचा तहसिलदारांचा दाखला व विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र आवश्यक.
2. पूर्वी शिष्यवृत्ती मिळत असल्यास त्याचा आदेश क्रमांक. (सवलत प्रमाणपत्र)
3. शिक्षणात खंड पडला असल्यास खंड प्रमाणपत्र.
4. उन्नत व प्रगत गट प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
5. इ. 10वी ची गुणपत्रिका व टी.सी. ची झेरॉक्स प्रत
6. आधार कार्ड बँक खात्याशी जोडणे आवश्यक आहे. Bank Linking पावती जोडणे आवश्यक.
7. उत्पन्न मर्यादा रू. 1,00,000/- असलेल्या OBC/VJNT/SBC विद्यार्थ्यांकरिता ही शिष्यवृत्ती आहे.
8. SC व ST विद्यार्थ्यांकरिता उत्पन्न मर्यादा रु. 2,50,000/- राहील. यापेक्षा जास्त उत्पन्न असल्यास उत्पन्नावर आधारित सवलत मिळेल.
9. एकाच पालकाचे फक्त दोन पाल्य शिष्यवृत्तीकरिता पात्र राहतील.
10. वरील सवलतींचे अर्ज न भरल्यास पूर्ण फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी.
11. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरावा व त्याच्या दोन प्रती कार्यालयात सादर कराव्या अन्यथा पुढील कार्यवाही करता येणार नाही.

### ई.बी.सी. सवलत (कनिष्ठ महाविद्यालय)

1. ई.बी.सी. सवलत पुढे चालू ठेवण्यासाठी शैक्षणिक सत्र 2018-19 चे अर्ज दोन प्रतीत.
2. उत्पन्नासंबंधीचा दाखला 15,000/- चे आत असावा.
3. मागील सत्रातील अपत्यासंबंधीचा दाखला वडिलांची सही व सरपंचाची किंवा दंडाधिकारी यांचे सही व शिक्क्यासह दोन प्रतीत.
4. वडील मरण पावल्यास मृत्यूचा दाखला.
5. मागील वर्षीचे ई.बी.सी. मंजुरीचे आदेश क्र. व दिनांक, प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्क्यासहित दोन प्रतीत सादर करावे.

### ई.बी.सी. सवलत (वरिष्ठ महाविद्यालय)

1. ई.बी.सी. सवलतीचा फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरावा.
2. रेशन कार्ड
3. रु. 1,00,000/-च्या आत उत्पन्न असल्याचा दाखला (तहसीलदाराच्या स्वाक्षरीचा)
4. आधार कार्ड
5. मागील वर्षाची गुणपत्रिका, टी.सी.
6. चालू वर्षाची प्रवेश पावती
7. शिक्षणक्रमात खंड पडला असेल तर त्या कालावधीतील खंड प्रमाणपत्र (दंडाधिकारी यांचे स्वाक्षरीचे)

## शुल्क विवरण (कनिष्ठ महाविद्यालय-कला आणि वाणिज्य)

| क्र. | शुल्क विवरण | वर्ग 11 वा | वर्ग 12 वा |
|---|---|---|---|
| 1) | प्रवेश शुल्क | 16.00 | 18.00 |
| 2) | अध्ययन शुल्क | 192.00 | 216.00 |
| 3) | सत्र शुल्क | 32.00 | 36.00 |
| 4) | प्रयोगशाळा शुल्क | 70.00 | 70.00 |
| 5) | प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (प्रति प्रात्यक्षिक पेपर) | ..... | 15.00 |
| 6) | ओळखपत्र शुल्क | 30.00 | 30.00 |
| 7) | कॉलेज मॅगेझिन | 70.00 | 70.00 |
| 8) | विमा सुरक्षा निधी | 10.00 | 10.00 |
| 9) | विविध सांस्कृतिक कार्यक्रम शुल्क | 70.00 | 70.00 |
| 10) | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क | 100.00 | 100.00 |
| 11) | बोर्ड प्रमाणपत्र शुल्क | ...... | 10.00 |
| **12)** | **(+) परीक्षा अर्ज शुल्क** | **......** | **बोर्डाचे नियमानुसार** |

## शुल्क विवरण (H.S.C. Vocational)

| क्र. | शुल्क विवरण | वर्ग 11 वा | वर्ग 12 वा |
|---|---|---|---|
| 1) | प्रवेश शुल्क | 20.00 | -- |
| 2) | अध्ययन शुल्क | 240.00 | 300.00 |
| 3) | सत्र शुल्क (प्रथम व द्वितीय सत्रासाठी) | 40.00 | 50.00 |
| 4) | कार्यशाळा/प्रयोगशाळा शुल्क | 80.00 | 100.00 |
| 5) | प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (प्रतिविषय रु. 30/-) | -- | 90.00 |
| 6) | ओळखपत्र शुल्क | 30.00 | 30.00 |
| 7) | कॉलेज मॅगेझिन | 70.00 | 70.00 |
| 8) | विमा सुरक्षा निधी | 10.00 | 10.00 |
| 9) | विविध सांस्कृतिक कार्यक्रम शुल्क | 70.00 | 70.00 |
| 10) | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क | 100.00 | 100.00 |
| 11) | संस्था विकास निधी (दरमहा रु. 50/-) | 600.00 | 500.00 |
| 12) | बोर्ड प्रमाणपत्र शुल्क | -- | 10.00 |
| **13)** | **(+) परीक्षा अर्ज शुल्क** | **--** | **बोर्डाचे नियमानुसार** |

# Junior College - Commerce [English Medium]
## (On Self-finance basis)

**Fee Structure -** Following will be the fees for 11th & 12th standards.

| No. | Description | 11th Std. | 12th Std. |
|---|---|---|---|
| 1) | Admission Fee | 16.00 | 18.00 |
| 2) | Tuition Fee | 4900.00 | 5100.00 |
| 3) | Term Fee | 32.00 | 36.00 |
| 4) | Laboratory (Computer Lab) Fee | 245.00 | 245.00 |
| 5) | Practical Examination Fee | .... | 15.00 |
| 6) | Identity Card | 30.00 | 30.00 |
| 7) | College Magazine | 70.00 | 70.00 |
| 8) | Safety Insurance Fund | 10.00 | 10.00 |
| 9) | Cultural Programme Fee | 70.00 | 70.00 |
| 10) | College Examination Fee | 100.00 | 100.00 |
| 11) | Board Certificate Fee | .... | 10.00 |
| 12) | Board Examination Application Fee | .... | As per Rule |

***Note:*** The above fees are subject to change by the College.

***Please Note -***

1. Every student admitted will have to pay the fees as mentioned in the schedule of fees and admission of the student will be confirmed only after the full payment of fees is received.
2. Fees once paid are not refundable unless admission is refused by the college.
3. All admissions will be done through online Pre-Admission application. The internet facility for the same is available in Babaji Datey Kala Ani Vanijya Mahavidyalaya.
4. Without online Pre-Admission application no admission will be granted.
5. Admissions will be on Merit basis.
6. All notices related to admissions & Merit list will be displayed on the college notice-board. No correspondence will be made personally.
7. The student should take his/her admission within **4 working days** after declaration of Merit list on the college notice-board.
8. Admission will be confirmed only after the payment of fees and submission of the necessary documents by him/her.

■

## शुल्क विवरण (वरिष्ठ महाविद्यालय-कला आणि वाणिज्य)

| क्र. | शुल्क विवरण | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1) | अध्ययन शुल्क | 800.00 | 800.00 | 800.00 |
| 2) | संगीत/गृहअर्थशास्त्र/भूगोल प्रयोगशाळा (बी.ए.1,2,3) प्रयोगशाळा शुल्क (CFS व ITB विषयांकरिता) (बी.कॉम.1,2) | 405.00 | 405.00 | 405.00 ..... |
| 3) | विद्यापीठ नोंदणी शुल्क | 100.00 | ..... | ..... |
| 4) | विद्यापीठ क्रीडा शुल्क | 50.00 | 50.00 | 50.00 |
| 5) | विद्यार्थी मदत निधी (Student Aid Fund) | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 6) | विद्यापीठ विद्यार्थी परिषद | 5.00 | 5.00 | 5.00 |
| 7) | विद्यापीठ वार्षिक शुल्क | 70.00 | 70.00 | 70.00 |
| 8) | व्यायामशाळा व क्रीडा स्पर्धा शुल्क | 135.00 | 135.00 | 135.00 |
| 9) | ओळखपत्र शुल्क | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 10) | वैद्यकीय तपासणी शुल्क | 45.00 | 45.00 | 45.00 |
| 11) | श्री संत गाडगेबाबा अध्यासन शुल्क | 1.00 | 1.00 | 1.00 |
| 12) | आपद्ग्रस्त निधी (विद्यापीठ) | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 13) | अश्वमेध शुल्क | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 14) | विद्यापीठ विमा शुल्क | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 15) | ग्रंथालय शुल्क | 135.00 | 135.00 | 135.00 |
| 16) | विद्यापीठ कॉर्पस फंड | 5.00 | 5.00 | 5.00 |
| 17) | शारीरीक क्षमता चाचणी शुल्क | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 18) | विद्यार्थी कल्याण निधी (Student Welfare Fund) | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 19) | पर्यावरणशास्त्र शुल्क | .... | 135.00 | .... |
| 20) | विविध सांस्कृतिक कार्यक्रम शुल्क | 70.00 | 70.00 | 70.00 |
| 21) | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क (सराव परीक्षा) | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 22) | फॅसिलिटी शुल्क (Facility Fees) | 70.00 | 70.00 | 70.00 |
| 23) | पदवी प्रमाणपत्र शुल्क (बी.ए.3, बी.कॉम.3 करिता) | .... | ..... | 200.00 |
| 24) | कॉलेज मॅगेझिन | 70.00 | 70.00 | 70.00 |
| **25)** | **(+) विद्यापीठ परीक्षा शुल्क** | | **....विद्यापीठाचे नियमानुसार....** | |

## पदव्युत्तर विभाग शुल्क विवरण (M.Com. & M.A.)

| क्र. | शुल्क विवरण | M.Com. Full Paying | M.Com. GOI | M.A. Full Paying | M.A. GOI |
|---|---|---|---|---|---|
| 1) | अध्ययन शुल्क | 3000.00 | - | 3000.00 | - |
| 2) | संगणक प्रयोगशाळा शुल्क | 2665.00 | - | - | - |
| 3) | ग्रंथालय शुल्क | 1330.00 | - | 1330.00 | - |
| 4) | विद्यापीठ क्रीडा शुल्क | 50.00 | - | 50.00 | - |
| 5) | प्रवजन (चळसीरींळेप) शुल्क | 155.00 | - | 155.00 | - |
| 6) | विद्यापीठ वार्षिक शुल्क | 70.00 | - | 70.00 | - |
| 7) | विद्यापीठ विद्यार्थी कल्याण निधी | 10.00 | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 8) | विद्यापीठ विद्यार्थी मंडळ शुल्क | 5.00 | - | 5.00 | - |
| 9) | ओळखपत्र शुल्क | 30.00 | 30.00 | 30.00 | 30.00 |
| 10) | श्री संत गाडगेबाबा अध्यासन शुल्क | 1.00 | - | 1.00 | - |
| 11) | आपद्ग्रस्त निधी | 10.00 | - | 10.00 | - |
| 12) | अश्वमेध शुल्क | 30.00 | - | 30.00 | - |
| 13) | विद्यापीठ कॉर्पस फंड | 10.00 | - | 10.00 | - |
| 14) | महाविद्यालयीन क्रीडा शुल्क | 135.00 | - | 135.00 | - |
| 15) | विविध सांस्कृतिक कार्यक्रम शुल्क | 70.00 | - | 70.00 | |
| 16) | विद्यार्थी मदत निधी | 25.00 | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 17) | विद्यापीठ निधी | 30.00 | - | 30.00 | - |
| 18) | विद्यापीठ विमा | 10.00 | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 19) | कॉलेज मॅगेझिन | 70.00 | - | 70.00 | - |
| 20) | विद्यापीठ स्पोर्टस फी | 25.00 | | 25.00 | |
| 21) | सराव परीक्षा शुल्क | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 22) | फॅसिलिटी शुल्क | 805.00 | - | 805.00 | - |
| **23)** | **(+) विद्यापीठ परीक्षा शुल्क** | **(विद्यापीठाचे नियमानुसार)** | | | |

## विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण नियम

1. महाविद्यालयातील विद्यार्थी हा चोवीस तास विद्यार्थी समजला जाईल. महाविद्यालयात व अन्यत्र त्याची वर्तणूक योग्यच असली पाहिजे. ती अयोग्य राहिल्यास तसेच त्याने महाविद्यालयाच्या अनुशासनाचे पालन न केल्यास त्याला महाविद्यालयातून काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.
2. अभ्यासक्रम सुरु होण्यापूर्वीच्या प्रार्थनेला प्रत्येक विद्यार्थ्याने आपली उपस्थिती पत्रिका घेऊन हजर असले पाहिजे. उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांला वर्गात प्रवेश मिळणार नाही, त्याची अनुपस्थिती मांडली जाईल.
3. कनिष्ठ महाविद्यालय तसेच पदवी व पदव्युत्तर स्तरावरील सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनींना महाविद्यालयाने ठरवलेला गणवेश घालणे अनिवार्य आहे. महाविद्यालयात येताना विद्यार्थ्याने महाविद्यालयाचा गणवेश घालणे तसेच आपले ओळखपत्र (Identity Card) जवळ बाळगणे अनिवार्य आहे. कर्मचारीवर्गापैकी कोणीही मागणी केल्यास ओळखपत्र दाखविले पाहिजे. विद्यार्थी-विद्यार्थिनी गणवेशात नसल्याचे किंवा त्यांचेजवळ ओळखपत्र नसल्याचे आढळल्यास दंड आकारला जाईल.
4. विद्यापिठाच्या नियमाप्रमाणे प्रत्येक विषयात 75% उपस्थिती आवश्यक आहे.
5. विद्यार्थ्यांनी प्रार्थना, शैक्षणिक तास, व्यायाम वर्गाची उपस्थिती व इतर आवश्यक उपस्थितीबाबत स्वतः जागरुक रहावे. पालकांनी वर्षभरात प्राचार्यांना भेटून आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घ्यावा.
6. महाविद्यालयाचे साहित्य, विद्युत उपकरणे, इमारतीच्या नुकसानीसाठी सामूहिक दंड केला जाईल.
7. महाविद्यालयाचे सर्व अभ्यासपूरक कार्यक्रम प्राचार्य व प्राध्यापकांच्या संमतीनेच ठरतील.
8. विद्यार्थ्यांनी 15 ऑगस्ट, 26 जानेवारी या राष्ट्रीय दिवशी महाविद्यालयाच्या गणवेशात उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा दंड आकारण्यात येईल.
9. पूर्वपरवानगीशिवाय सतत 8 दिवस अनुपस्थित राहिल्यास विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नाव हजेरीपटावरुन कमी होईल. हजेरीपटावर पुन्हा नाव घेण्यासाठी 100 रु. शुल्क भरावे लागेल. ही सवलत एकदाच मिळेल.
10. मोर्चे, संप, अन्य राजकीय आंदोलने व हिंसक कृत्ये, प्राध्यापक व मुलामुलींशी असभ्य वागणूक इ. प्रकारात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांस महाविद्यालयातून ताबडतोब काढून टाकण्यात येईल.
11. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा किंवा विद्यापिठाच्या परीक्षेचा निकाल लागून गुणपत्रिका/प्रमाणपत्रे कार्यालयात प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत विद्यार्थ्याने आपली गुणपत्रिका/प्रमाणपत्र कार्यालयातून न्यावी. त्यानंतर गुणपत्रिका/प्रमाणपत्रे जपून ठेवण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार नाही.

12. महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखू, गुटखा इ. मादक पदार्थ बाळगण्यास/सेवन करण्यास कायद्याने सक्त मनाई आहे. असे नियमबाह्य कृत्य विद्यार्थ्यांकडून घडल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई होईल.
13. महाविद्यालयाच्या संपूर्ण परिसरात विद्यार्थ्यांना मोबाईल वापरण्यास परवानगी नाही.
14. महाविद्यालय मध्येच सोडताना महाविद्यालयाची दोन्ही ओळखपत्रे महाविद्यालयात जमा करावी लागतील.
15. विद्यार्थ्याने महाविद्यालयात प्रवेश घेतला याचा अर्थ, त्याला व त्याच्या पालकाला वरील सर्व नियम मान्य आहेत, तसेच त्यात किंवा विद्यापिठाच्या/शासनाच्या नियमांत वेळोवेळी होणारे फेरबदलही मान्य राहतील असा होईल व सर्व नियम त्याला बंधनकारक राहतील.

## विद्यार्थिनी वसतिगृह

महाविद्यालयीन विद्यार्थिनींकरिता महाविद्यालयाचे परिसरात सुरक्षित वातावरण आणि सर्व सोयींनी युक्त अशा वसतिगृहाची सुविधा उपलब्ध आहे. जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी या वसतिगृहाचा लाभ घ्यावा. वसतिगृहाचे प्रवेश अर्ज वसतिगृहाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

## सायकल स्टॅन्ड

महाविद्यालयात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींकरिता सायकल स्टॅन्डची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. सायकली कुलूप लावून सायकल स्टॅन्डवरच ठेवाव्यात. सायकल स्टॅन्ड व्यतिरिक्त इतरत्र सायकली किंवा इतर वाहने उभी करू नयेत. कुलूप नसलेली वाहने महाविद्यालयात आणू नयेत.

## विद्यार्थी उपाहारगृह

बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी उपाहारगृह असून या उपाहारगृहामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, कर्मचारीवर्गासाठी उत्कृष्ट, दर्जेदार नाश्ता, चहा मिळण्याची तसेच थंड फिल्टर्ड पाण्याची व्यवस्था केलेली आहे. उपाहारगृहामध्ये बसण्याची उत्तम व्यवस्था आहे.

**टीप** - माहितीपत्रकामध्ये नमूद केलेल्या व नमूद न केलेल्या सर्व गोष्टींबाबत, प्रशासकीय तसेच सर्वसाधारण नियमांमध्ये फेरबदल करण्याबाबत अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील.

## पसायदान

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥1॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो
भूता परस्परे जडो । मैत्र जीवांचे ॥2॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छिल तो ते लाहो । प्राणिजात ॥3॥
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी
अनवरत् भूमंडळी । भेटतु भूतां ॥4॥
चला कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचे गाव
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ॥5॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ॥6॥
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥7॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये
दृष्टादृष्ट विजये । हो आवेजी ॥8॥
येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो । हा होईल दान पसावो
येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥9॥

**प्रकाशक**
प्रभारी प्राचार्य सौ. प्रेरणा प्र. पुराणिक
बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय
शिवाजी नगर, यवतमाळ-445001
फोनः (07232) 244053, 239900
Website: www.dateycollege.in email: kvmvy@gmail.com

---

सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता **www.dateycollege.in** किंवा **epravesh.com/dateycollege/** या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश-पूर्व अर्ज भरावा.